# वचन

आपण एका वस्तूबद्दल बोलू लागलो की ते –एकवचन व अनेकांबद्दल बोलू लागलो की – अनेकवचन

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| फूल  | फुले  |
| मासा  | मासे  |
| फळ  | फळे  |
| आंबा  | आंबे  |
| केळे  | केळी  |
| पुस्तक  | पुस्तके  |

## अ) वचन ओळखा.

१) बगळा एकवचन

२) घोडे अनेकवचन

३) झाड एकवचन

४) दिवा एकवचन

## आ) एकवचन लिहा.

१) ससे ससा

२) मुले मूल

## अनेकवचन लिहा.

१) पेढा पेढे

२) रस्ता रस्ते

# विरामचिन्हे

१) पूर्णविराम = ( . ) – वाक्य पूर्ण झाल्यानंतर

जसे – भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर आहे.

२) स्वल्पविराम = ( , ) – अनेक गोष्टींचा बोध होताना

जसे – आईने बाजारातून पपई, केळी, संत्री, मोसंबी व सफरचंद आणले.

३) प्रश्नचिन्ह = ( ? ) – प्रश्न विचारुन झाल्यानंतर

जसे – तुझे नाव काय आहे?

४) उद्गारवाचक – ( ! ) – आश्चर्य वाटणे, आनंद झाल्यावर

जसे – अरे वा! कित्ती छान!

**अ) योग्य विरामचिन्हे देऊन वाक्य पुन्हा लिहा.**

१) रिया शाळेतून कधी येणार

रिया शाळेतून कधी येणार ?

२) दादाने मला खाऊ आणला

दादाने मला खाऊ आणला.

३) बापरे किती उंच इमारत ही

बापरे! किती उंच इमारत ही !

४) आईने दिवाळीसाठी लाडू चकली करंजी शेव चिवडा बनविले

आईने दिवाळीसाठी लाडू, चकली, करंजी, शेव, चिवडा बनविले.

र = ( ् ) = क्रम = क् + र + अ + म = क्रम

र = ( ् ) = ट्रक = ट् + र + क = ट्रक

**अ) पाहा, वाचा व लिहा.**

१) वाक्य वाक्य २) अरण्य अरण्य

३) मनुष्य मनुष्य ४) न्याय न्याय

**आ) कंसातील चिन्हे वापरून शब्द पुन्हा लिहा.**

( ʽ ) – सूय सूर्य गव गर्व पवत पर्वत अथव अथर्व

( ‸ ) – राष्ट राष्ट्र डम ड्रम टक ट्रक डिल ड्रिल

( ् ) – गंथ ग्रंथ विकम विक्रम कोध क्रोध फेंच फ्रेंच